Punter

Gulab Hasan Nadaf

# पंटर

भोवताली दगडांच्या उंचच उंच भिंती असलेल्या तटबंदीचा तो कोल्हापूरचा कळंबा जेल ! रात्रीची आठ सव्वा आठ वाजताची वेळ ! तशी रात्र फार झाली नव्हती. पण नियमानुसार ठराविक वेळी तुरुंगाची ती लोखंडी गजांची करकरणारी दारे बंद झाली होती. साडे पाच वाजताच आपल्या अल्युम्युनियमच्या थाळ्यात आपल्या वाट्याचा भत्ता घेऊन कैद्यानी जेवणे उरकली होती. आणि आता पहाटे पाच वाजेपर्यंत नुसते कोंडून घ्यायचे होते. मधल्या बारा तासाच्या रात्री आज विसरून उद्याची वाट पहायची होती. बिछान्यावर पडल्या पडल्या, शिक्षेच्या संपलेल्या व शिल्लक राहिलेल्या दिवसांचा हिशोब करायचा होता. घराकडल्या सुखद अथवा दुःखद आठवणीत स्वतःला विसरायचे होते. आणि याशिवाय तिथे दुसऱ्या गोष्टीला वावच कुठे होता ? फार तर मागे कधीच न भेटलेल्या व पुढे भेटण्याची शक्यता कमी असलेल्या व तुरुंगातच दोस्ती जमलेल्या अशा अनोळखी दोस्तांशी घोळवत-घोळवत झोप येईपर्यंत निरर्थक गोष्टी करत बसायचे! किंवा थाळी टमरेल वाजवून आपणास येईल तसे एखादे बेसूर बेताल गाणे म्हणायचे ! येवढेच काय ते तिथे शक्य होते, आणि अशा गप्पा व अशी गाणी बहुतेक बराकीतून चालली होती. एरवी आजूबाजूचा परिसर अगदी निःशब्द शांत होता. त्या ओसाड माळावरच्या त्या तुरुंगात अंदाजे ते पावणेतीनशे कैदी होते. रोज चार दोन सुटत होते. व नव्याने आलेल्या चार-दोनांची त्यात भर पडून पुन्हा आकडा बरोबर होत होता.

गप्पावाल्यांनी आता गप्पा थांबवल्या. गाणारेही आता थांबले. हातातील थाळ्या टमरेले त्यानी निडकीत ठेवली व मग प्रत्येक जण आपापली वळकटी झटकून अंथरू लागला. नुसत्या बसून राहिलेल्या कैद्यानीही आपले शिणलेले अंग जमिनीवर टाकले. पहाटे त्याना हवालदार व वार्डरच्या 'उठ जाव' या हाके सरशी उठायचे होते. नाही तर, 'साला गांडू !' या शिवी-बरोबरच पेकटात एखादी लाथ बसायची शक्यता होती. ते तुरुंगाचे जीवन होते. गुन्हेगाराचे सान्निध्य, पहारेकऱ्याचा धाक, मजबूत भक्कम भिंतीचा सापळा, यात आपली शिक्षेची मुदत संपवून त्याना बाहेर पडायचे होते. थोडयाच वेळात तिथे खऱ्या अर्थाने स्मशान शांतता पसरली. पहारेकऱ्यांचे धावत्या आवाजातील 'अलबेऽऽल' किंवा लांबून घुबडाच्या 'घू ! घू ! घू !' याशिवाय कसली हालचाल किंवा आवाज येत नव्हता. काही कैद्याना नुकतीच झोप लागली होती तर काही कैदी कसल्या तरी विचारात नुसतेच तोंडावरून पांघरूण घेऊन अंथरुणावर पडले होते.

त्या सात बराकीचा तो मोठा मुख्य दरवाजा करकरला. आणि त्या पाठोपाठ बुटांचा आवाजही आला. जागे असलेले कैदी उगीचच उठून बसले. त्यांना फक्त आता कोण नवीन मेंबर आला, एवढेच पहायचे होते. बाकी हे नेहमीचेच होते. तरीही माणसाला उत्सुकता ही असतेच. काही सावध निद्रेच्या कैद्यांची झोप चाळवली. तेही जांभया देत उठून बसले. त्या आलेल्या पोलीसाशी पहाऱ्यावरील पोलीसांची काही बातचीत झाली आणि आलेल्या पोलीसांनी आपणाबरोबर आणलेल्या एका तरुण कैद्याला त्या पहारेकऱ्यांच्या ताब्यात दिले. व ते आले तसेच निघून गेले.

सात नंबरच्या त्या बराकीतील कैद्यांनी दाराकडे पाहिले. दार उघडले गेले. व त्या तरुण कैद्याला आत

ढकलून दार बंद झाले. बावरलेला तो तरुण कैदी भेदरल्या दृष्टीने क्षणभर बराकीतून इकडून तिकडे आलटून पालटून पहात राहिला. व मग तो वार्डरने दाखविलेल्या जागेकडे आपली जड पावले उचलित निघाला. सर्व कैद्यांच्या शेवटी असलेल्या आपल्या जागेवर जाऊन मघाशी बाहेर मिळालेला आपला बिस्तरा टाकला व भिंतीला टेकून त्याने गुडघ्यात मान खुपसली.

हे दृष्य इथे अंगवळणीच पडलेले असल्यामुळे इतर कैद्यांनी 'चालायचंच आज नवीन हाय!' असे पुटपुटत पुन्हा अंथरुणावर आपले अंग टाकले. दुसऱ्या ओळीतले दोन तीन वयस्क कैदी मात्र, त्याच्याकडे दृष्टी वरचेवर टाकीत व आपापसात कुजबुजत बसून राहिले.

तो तरुण कैदी कितीतरी वेळ तशाच अवस्थेत बसून राहिला. त्या वयस्क कैद्यापैकी राणू भोसले नावाच्या कैद्याने आपल्या जागेवरून उठून, त्याच्याजवळ जाऊन त्याच्या खांद्यावर थोपटीत म्हटले, 'झोप की रं! पोरा! आता आल्यायसच हितं, तर असं गुडघ्यात मान घालून भागतंय व्हय?'

चटकन त्या तरुण कैद्याने मान वर केली. व त्याचवेळी त्याच्या भकास डोळ्यातून खळकन अश्रू ओघळले. त्याची छाती खालवर होऊ लागली. व पुढच्याच क्षणी तो ओक्साबोक्सी रडू लागला.

तेव्हा त्याच्या जवळ बसून, राणू भोसला त्याच्या पाठीवरून हात फिरवीत सहानुभूतीने म्हणाला, 'पोरा हितं असं रडून भागत नसतंय? मन घट्ट करून दिस ढकलायचं असत्यात! गुना करायच्या आदीच त्याचा इचार करायचा असतोय, आता रडून काय उपेग!

'काय सुहीक बोलू नगासा.' नकारात्मक मान हलवीत काहीसा चिडून तो तरुण कैदी म्हणाला, 'गुना केला आसता, तर मनाला समजावलं असतं! आसा रडत बसलो नसतो!'

'ऑ? म्हंजी बिनगुन्याचाच तुरुंगात आलायस म्हन की! खरं हाय तुजबी, हितं आल्यावर सारंजण आसंच म्हंत्यात.' असे म्हणत आपल्या मुरब्बी दृष्टीने त्याच्याकडे राणू भोसल्याने पाहिले. पण का कोण जाणे राणू भोसल्याला त्याच्या अशा या कळवळण्याने, मनाला जरा खटकले. व त्याने म्हटले, 'खरं म्हंतोस? कायबी गुना न्हाई तुजा?'

'गुनाच म्हटलासा, तर एक गुन्हा मातूर गरीब आईबाच्या पोटी मी जलामलो ह्यो येवढा हाय मांजा! शर्टाच्या बाहीने गळणारे डोळे त्याने म्हटले.

'आरं आसं हुमान घातल्यावानी काय बोलतोस जरा सवंनं सांग की! गुना नाही, तर मग कुनी रीनं हितं आनला का तुला?'

आता त्या तरुणाजवळ हळूहळू कैद्यांचा घोळका [illegible] लागला. आणि मग जो तो राणू प्रमाणेच विचा[illegible] लागला. कुणी कुत्सीतपणे तर कुणी त्याच्या[illegible] सहानुभुतीने कुजबुजू लागले. त्या तरुणाचा आता [illegible] व दुःखाचा पहिला आवेग कमी झाला. व त्याने [illegible] आपली कर्म कहाणी सांगण्यास सुरुवात केली.

कवठेमहांकाळ तालुक्यातील एका खेड्यातला तरुण, वयाच्या चवदाव्या वर्षीच त्याच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र गेले. दोन धाकट्या बहिणी व आई [illegible] ते चार जणांचे कुटुंब! कोवळ्या वयातच तो आपल्या आई बरोबर मजुरीला जाऊ लागला. तो भाग म्हणजे मुळातच निमदुष्काळी! आणि त्यातच १९७३ साल उजाडले. ते साल म्हणजे जणू महाराष्ट्राला भाजून काढणारे साल निघाले. आणि हा नेहमीचा निमदुष्काळी तालुका वणव्याच्या मध्यभागी सापडला. व संपूर्ण होरपळून निघाला. त्याचे वय आता वीस बावीस वर्षे होते. दोन बहिणी लग्नाला आल्या होत्या. आता लग्न तर सोडाच, पण आजचा दिवस ओलांडायचा कसा याचाच जिकडे तिकडे प्रश्न पडला होता. नेटकी कुटुंब सुद्धा मेटाकुटीला आली होती. आधीच तग धरून असलेली गरीब दलीत कुटुंबे तर वावटळीत पाला पाचोळा उडावा तशी उडत होती. दुष्काळाने जबडा पसरला. मुळे रोजगार थंडावला होता. काही ठिकाणी दुष्काळी कामे निघाली होती. पण ती अपुरी होती. तिथे मजुरांची झुंबड उडाली होती. त्या कामावर साऱ्यांचीच गुजराण होणे शक्य नव्हते. आणि त्यातच मुसंडी मारून पुढे घुसणाऱ्यांनाच तिथे काम मिळत होते. व लाजऱ्या-बुजऱ्या गरजवंताला त्यापासून वंचीतच रहावे लागत होते. अशी अनेक कुटुंबे त्या दुष्काळाच्या कराल दाढे-खाली चिरडली जात होती.

भुकेल्या पोटी वणवण भटकणाऱ्या या तरुणाला, एके दिवशी कुणाकडून तरी कळले कोल्हापूर भागात

झाले ! त्या कामाला हपापलेल्या तरु-णात वारे शिरले, रात्रभर त्याला कामावर स्वप्ने पडली. व सकाळी उठताक्षणी त्याने म्हटले, 'आई ! कोल्हापूर भागाला. मायंदाळ ळल्यात म्हणं, मी जातो तिकडं.'

मनातून कळवळून आई म्हणाली, 'कुठलं काम लेकरा, जकडं तकडं रिकाम्या हाताचं प्याव तुझो कोन वाट बगत बसलंय तिकडं ? आपल्या न्हाऊनच साऱ्यासंगं काय हुयाचं असलं ते

व्हय पर मी म्हंतो, जरा हात पाय हालवून बिगी-तर काय बिगडतंय ? बसल्या जागी टाचा घासून पापरास बरं न्हाई का ते ?'

'व्हय रं ! पर आसं पर मुलखाला आवचीत जाऊन म्हणून रहायचं, कुटं काम बगायचं ? आणि तवर खायाचं तरी काय ? आणि हितनं तितवर जायाला खर्चाला काय करायचं ?' आईने त्याच्यापुढे अडचणीचे डोंगर उभे केले. पण त्या उत्साही तरुणाने तिचे काही ऐकले नाही. व आपला हट्ट सोडला नाही. आणि मग नाईलाजाने म्हातारी गप्प बसली. हा जाण्यास निघाला तेव्हा तिने साऱ्या गावातून फिरून चार भाकरीचे बाजरीचे पीठ पैदा केले. आणि कितीतरी दिवसाचे टोपलीत पडलेले दोन कांदे त्यावर घालून शिदोरी बांधून त्याच्या हाती देत म्हटले, 'जपून रं लेकरा ! बिनओळखीच्या जागी चाललायस हुशारीनं न्हा म्हंजी झालं !' व बाहेर पडू पहाणारे अश्रू तिने बाजूला तोंड करून पुसले. भरल्या-स्वराने बहिणीनीही निरोप दिला आणि हा तरूण पाठीशी शिदोरी लावून काम शोधण्याच्या मोहिमेवर निघाला. तो डोळ्याआड होई-पर्यंत आई व बहिणी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात उभ्या होत्या.

पायी चालत आणि आईने बांधलेल्या भाकरी पुरवून पुरवून खात तिसऱ्या दिवशी त्याने एक लहानसे शहर गाठले. तिथून कोल्हापूर एक दिवसाच्या रस्त्यावर होते. पण आता त्याच्या जवळच्या भाकऱ्या संपल्या होत्या. वरून उन्हाची तिरीप व पोटात भुकेची आग यामुळ त्याचा जीव कासावीस झाला होता. एका हॉटेलासमोर येऊन तो थोडा वेळ थांबला. काचेच्या कपाटातील खाण्याचे जिन्नस पाहून त्याच्या तोंडात लाळ जमा होवू लागली. त्याला वाटले. आपल्या खिशात यावेळी थोडे-तरी पैसे असते तर किती बरे झाले असते ? अशा भुकेच्या वेळी आपण थोडे तरी यातले काही खाऊन पाणी प्यालो असतो. पण या नुसत्या, असते तर या गोष्टी होत्या. आणि या कल्पनेसरशी नुसत्या विव्ह-ळण्याशिवाय तो काहीच करू शकत नव्हता

कोरडा घसा तरी थोडा ओला करावा, या इराद्याने त्याने हॉटेलात पाऊल टाकले, व टेबलावर भरून ठेव-लेल्या ग्लासातून एक ग्लास उचलून त्याने तोंडाला लावला. आणि चटकन हॉटेलातला पोऱ्या त्याच्याजवळ येऊन म्हणून म्हणाला, 'काय देऊ ?'

ग्लास बाजूला करून त्याने म्हटले, 'काय नको बाबा ! निसतं पाणी प्यायला आलोय मी !

'तुमी निसतं पाणी पिऊन जाचीला, आणि मालक आमच्या डोक्सीची केसं काढतील !' असे म्हणत त्या पोराने रागानेच त्याच्या हातातील ग्लासाला हात घातला. व डोळे वटारीत त्याने म्हटले, 'ह्या दुष्काळात पाणी मिळत न्हाई म्हणून निसतं पाणी कुनाला द्यायचं न्हाई आशी ताकीत दिलीया मालकानी आमाला !'

'आरं बाबा ! पाण्यालाबी काय पैसं पडत्याती ! तानेवाल्याला घशाला घोटभर पाणीबी दिऊ देत न्हाईत व्हय तुजं मालक ?' आता त्याला त्या पोराचा रागच आला !

आणि इकडे गल्ल्यावर बसून पोलीसाशी बोलण्यात गढून गेलेल्या मालकाचे, करीमशेठचे तिकडे लक्ष गेले. व त्याने बसल्या जागेवरूनच त्या पोरावर खेकसत म्हटले, 'क्या रे ! क्या चला है?''

'इसकू खाली पाणीच पिनेकू हुना कते ?' मालका-पेक्षाही शुद्ध हिंदीत पोराने खुलासा केला. आणि मालकासह ते पोलीसही त्या नवख्या तरुणाकडे पाहू लागले. या नुसत्या पाणी पिणाऱ्या गिऱ्हाईकाकडे पाहून प्रथम करीमशेठचे डोके भडकले. या दुष्काळाच्या काळात आपणास पाण्याला पैसा मोजावा लागतो. आणि हे असले टिकोजी गिऱ्हाईक मा ऽ र फुकट पाणी पितंय म्हणजे काय ? क्षणात त्याच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले. परंतु पुढच्याच क्षणी कोणती जादूची कांडी फिरली कोण जाणे, त्याचा चेहरा उल्ह-सीत झाला. स्वरात मृदूपणा आला. त्या तरुणाच्या एकंदर अवताराकडे पाहून त्याला त्याची कमालीची

दया आली असावी. निदान त्याच्या चेहऱ्यावर तरी दिसत होते. आणि मग त्या पोराला दटावीत त्याने म्हटले, 'पाणीके वास्ते काय कू लडतायरे बेटे ! दे उसकू औरभी एक गलास दे ! प्यासे कू पाणी देनेसे सवाब मिलता है !'

मालकाची ही दयेची भाषा ऐकून तो पोऱ्याही गोंधळला. अशी भाषा तो मालकाच्या तोंडून कधी तरीच ऐकत होता. नाहीतर सततची उद्धटपणाची मुक्तफळे आता त्याला पाठ झाली होती. अधूनमधून ठरावीक वेळीच असा मालक दयेची भाषा बोलायचा. मालकाकडे पहातच त्याने टेबलावरचा दुसरा ग्लास उचलून त्या तरुणाच्या हाती दिला व तो दुसऱ्या गिऱ्हाईकाकडे वळला.

करीमशेठचे हॉटेल म्हणजे त्या शहरातील श्रमपरिहाराचे एकमेव ठिकाण होते. त्याच्या हॉटेलात चमचमीत ताजे जिन्नस तर मिळायचेच ! पण त्याच बरोबर इच्छुकाना हातभट्टीची ताजी मदिराही मिळायची. त्यामुळे त्याच्या हॉटेलात सर्व नमुन्याच्या गिऱ्हाईकांची सतत झुंबड उडायची. त्यासाठी त्यानी आतल्या बाजूला एका खास खोलीची व्यवस्था केली होती. इतर गिऱ्हाईकांबरोबरच वरचेवर पोलीसांची पायधूळही झडत असे. मात्र पोलीस तिथे कशासाठी येत हे मात्र नक्की कुणाला कळत नसे ! चार आठ दिवसाला त्यांची एकादी फेरी असे एव्हढे मात्र खरे.

मघाच्या त्या तरुणाने दोन तीन ग्लास पाणी घशाखाली लोटले. आणि तो बाहेर निघाला. तेव्हा त्याला थांबवीत, करीमशेठ सहानुभूतीच्या स्वरात त्याला उद्देशून म्हणाला, 'कोंच्या गावचा रं पोरा तू ?'

'लांब तिकडं जत, कवठेमहांकाळ' पोलीसाकडे पाहून बावरलेल्या त्या तरुणाने म्हटले.

'लांबनं आलास किरं ! काय बेत ?, मालकाचा दुसरा प्रश्न.

'काम हुडकाय आलोय न्हवं का ? आमाकडं ह्या दुस्काळानं लई हाल चाललेत माणसाचं! तवा हिकडं कुटं तर काम मिळतंय का बगावं म्हनून आलोय.'

'हं !' हाल हयाचंच बाबा ! एक हुंकार भरत मालक कळवळून म्हणाला, 'जगात पापाचा साठा लई झालाय म्हणून ह्यो दुष्काळ पडलाय ! तरी आजून माणसाचं डोळं उघडना झाल्यात ! बरं काम हुडकतोस म्हंजे कसलं काम पायजे तुला ?'

'आता कसलं आणि काय ? मिळंल ते कामा यचंच की ! कोंचंबी काम करून जगायचं येवढं तुमच्याकडं कसलं काम हाय ?' आशाळभूतपणे त्या तरूणाने म्हटले.

आणि होकारार्थी मान डोलवीत करीमशेठ म्हणाला, 'मिळंल तुला पर इमानानं करायला पायजे'

'आवो काम दिऊन तर बगा, कसा काम करतो ते !' उत्साहीतपणे तो तरूण म्हणाला.

आणि मग करीमशेठने पोऱ्याला आर्डर सोडली 'रजक्या ! इसकू अंदर लिजाकू कुछ खानेकू दे' आणि रजक्याने त्याला आत नेऊन भरपूर खायला दिले. त्या दिवसापासून त्या तरुणाला काम मिळाले आणि पोटभर खायला मिळून पगारही भरपूर ठरला त्याचे काम म्हणजे, त्याला दाखवलेल्या जागेवरचा किलतानाने गुंडाळलेला एक जाडसा कसला तरी रबरी फुगा आणून हॉटेलात पोहोचता करायचा !

आणि पाचव्याच दिवशी पोलीसानी त्याला रस्त्यात गाठले. त्या तरुणाने खूप गयावया केले. पण त्याचा उपयोग झाला नाही. आणि आज तो महीन्याची शिक्षा घेऊन कळंबा जेलमध्ये आला होता.

त्याची ही हकीगत ऐकून चटकन एका कैद्याने म्हटले, 'म्हंजे तू पंटर हायस म्हन की !'

आश्चर्याने त्या कैद्याकडे पहात तो तरुण म्हणाला. 'पंटर म्हंजे !'

'म्हंजे आसं', त्या मघाच्या कैद्याने म्हटले. बाबा तुज्यावानी तुरुंगात येणाऱ्याला पंटर म्हंत्यात ! त्या साला बोकूड कापत न्हाईत का ? तसं आसतंय हे! आपला धंदा बिनघोर चालावा म्हणून तुज्यासरक्यांची कंदुरी करावी लागतीया. ह्यो दारुबंदीचा कायदा झाल्यापासनं आशा लई कंदुऱ्या झाल्यात ! आणि ह्यालाच पंटर म्हंत्यात !'

आता त्या तरुण कैद्याचे डोके गरगरल्यासारखे होऊ लागले होते. हळू हळू एकेक कैदी उठून आपापल्या जागेकडे जाऊ लागले. रात्र वाढत होती. मधून मधून घुवडाचे घुत्कार त्या अंधाऱ्या रात्रीच्या पोटात दवळत होते. पहारकऱ्यांच्या 'अलबेऽऽल' बरोबरच त्या तरुण कैद्याच्या कानाजवळ मघाचे ते शब्द घोंगावत होते 'पंटऽऽर, पंटऽऽर, पंटऽऽर'.

—गुलाब हसन नदाफ